नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १०/०७/२०२६ (शुक्रवार )

# नागपूर ग्रामीण पोलीसांकडून २.९६ कोटी रुपयांच्या जप्त अंमली पदार्थांची नियमानुसार विल्हेवाट

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात दिनांक ०९/०७/२०२६ रोजी श्री अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या उपस्थितीत नागपूर ग्रामीण जिल्ह्यात एन.डी.पी.एस. कायद्यान्वये दाखल ६० गुन्हयांमधील जप्त अंमली पदार्थांची नियमानुसार विल्हेवाट लावण्यात आली.

सदर कार्यवाहीदरम्यान एकुण ६९२ किलो २६९ ग्रॅम वजनाचे अंमली पदार्थ किंमती २,९६,३५,८३५/— रुपयांच्या मुद्देमालाचा पंचनामा करून बुटीबोरी येथील **Maharashtra Enviro Power Limited** येथे पर्यावरणपूरक व नियमानुसार नाश करण्यात आला. नष्ट करण्यात आलेल्या अंमली पदार्थांमध्ये ६५६ किलो ७८ ग्रॅम गांजा, १७७ ग्रॅम एम.डी, ४५ ग्रॅम ब्राऊन शुगर तसेच ३५ किलो ९६९ ग्रॅम पॉपी स्ट्रॉ यांचा समावेश होता.

सदर कार्यवाही वेळी श्री मयंक माधव, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग — प्रभार उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर उपविभाग, श्री अंकुश माने, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण, सहापोलीस निरीक्षक श्री प्रशांत भोयर , प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन एमआयडीसी बुटीबोरी तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.





# व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलीस, AIIMS नागपूर, आणि प्रवाह फाउंडेशन यांचा संयुक्त पुढाकार

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच श्री अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या नेतृत्वात नागपूर ग्रामीण पोलीस अंमली पदार्थांविरुद्ध कठोर कारवाई करण्याबरोबरच व्यसनमुक्त समाज निर्मितीसाठी विविध प्रतिबंधात्मक व जनजागृतीपर उपक्रम प्रभावीपणे राबवत आहेत. आज दिनांक १०/०७/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण पोलीस, एम्स (AIIMS) नागपूर आणि प्रवाह फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने समुदायाधारित व्यसनमुक्ती जनजागृती कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याच्या उद्देशाने एम्स (AIIMS) नागपूर येथे बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीचे अध्यक्षस्थान एम्स नागपूरचे कार्यकारी संचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. डॉ. प्रशांत पी. जोशी यांनी भूषविले.या बैठकीस श्री सागर यशवंत खर्डे, सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग, प्रवाह फाउंडेशनचे प्रतिनिधी तसेच एम्स (AIIMS) नागपूरच्या मानसोपचार विभागातील प्राध्यापक व तज्ज्ञ उपस्थित होते.

एम्स (AIIMS) नागपूरच्या मानसोपचार विभागाअंतर्गत ॲडिक्शन ट्रीटमेंट फॅसिलिटी (ATF) यांच्या पुढाकाराने आयोजित या बैठकीत नागपूर ग्रामीण पोलीस, प्रवाह फाउंडेशन आणि आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञ यांच्यात व्यसनमुक्ती अभियान अधिक प्रभावी करण्यासाठी समन्वय वाढविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत व्यसनाधीनतेबाबत समाजातील गैरसमज दूर करणे, व्यसन हा उपचारयोग्य वैद्यकीय आजार असल्याची जनजागृती करणे, अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे, उपचार सेवा अधिक सुलभ करणे तसेच व्यसनमुक्ती आणि पुनर्वसनासाठी विविध विभागांमध्ये प्रभावी समन्वय प्रस्थापित करण्याबाबत चर्चा करण्यात आली.

नागपूर ग्रामीण पोलीसांनी पोलीस –जनता संवादादरम्यान , गावभेटी दरम्यान व्यसनाच्या समस्येने ग्रस्त व्यक्तींची ओळख पटवून त्यांना समुपदेशन, वैद्यकीय तपासणी व उपचारासाठी एम्स (AIIMS) नागपूरच्या ॲडिक्शन ट्रीटमेंट फॅसिलिटी (ATF) येथे नेले. नागपुर ग्रामीण जिल्हयातील सावनेर उपविभागातील आणि काटोल उपविभागातील अंमली पदार्थ सेवनाच्या गुन्हयातील १७ व्यक्तींचे समुपदेशन करण्यात आले.

या संयुक्त उपक्रमामुळे व्यसनाधीन व्यक्तींना वेळेत उपचार उपलब्ध होण्यास मदत होणार असून, आरोग्य यंत्रणा, पोलीस प्रशासन आणि सामाजिक संस्थांच्या समन्वयातून व्यसनमुक्त, सुरक्षित आणि निरोगी समाज घडविण्याच्या दिशेने हे महत्त्वपूर्ण ठरणार आहे.


Reception Counter
Room No. 1


10 July 2026 11:47 am

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द २ गुन्हे नोंद, ८६ लाख १४ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त भिवापुर पोलीस यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापुर :—** दिनांक ०८/०७/२०२६ रोजी भिवापुर अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा भगवानपुर ब्रेकर जवळ नाकाबंदी केली नाकाबंदी दरम्यान **वाहन क्रं १) १६ चाकी एल पी क्र एम एच २७ डी टी ३६६३ आणि वाहन क्रं २) १२ चाकी टिप्पर क्र एच ३० बी डी ७९३१** ही वाहने मिळून आल्याने नमुद वाहनांची पंचासमक्ष तपासणी केली असता त्यामध्ये रेती असल्याचे आढळून आले. नमुद वाहन चालकांना रेती परवान्याबाबत विचारणा केली असता त्यांच्याकडे असलेल्या रेती परवान्यापेक्षा अधिक रेतीची वाहतूक करत असल्याचा संशय निर्माण झाल्याने सदर वाहनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्रव्यवहार करून सदर वाहनाचे वजन करण्यात आले. तपासणीनंतर सदर वाहनात नमुद दोन्ही परवान्यापेक्षा अतिरिक्त रेती तसेच विहीत क्षमतेपेक्षा अतिरिक्त रेती असल्याचे निष्पन्न झाले. वाहन क्रं १) एल पी क्र एम एच २७ डी टी ३६६३ मध्ये १२.४६ ब्रास रेती मिळुन आली. २) एल पी क्र एच ३० बी डी ७९३१ मध्ये १०.४५ ब्रास रेती मिळुन आली.

**पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद दोन्ही वाहन आणि २२.९१ ब्रास रेती किंमती १,१४,००० /— रूपये असा एकुण किमती ८६,१४,००० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. सदर प्रकरणी वाहन क्रं १) चा चालक /मालक नामे फारूख खान मिया खॉन, वय ४२ वर्ष,रा जाकीर हुसैन वार्ड, गर्ग कॉलनी, अमगोहन बैतुल, राज्य मध्यप्रदेश वाहन क्रं २) चा चालक/मालक नामे शेखर कैलास बिल्लेवार, वय २६ वर्षे, रा. टाकली जलम, जुने शहर, ता. जि. अकोला यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन भिवापुर येथे कलम ३०३(२), ४९, ३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४,२१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम, सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये प्रत्येकी १ असे २ गुन्हे दाखल करण्यात आला आहे.**




## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. पाचगाव पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पाचगाव** :— दिनांक ०९/०७/२०२६ रोजी पाचगाव पोलीसांना गुप्तबामीदारा द्वारे खात्रीशीर माहीती मिळाली की, , उंद्री तलाव जवळील ऐरीकेशन ऑफीस समोर मोकळया जागेत काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. पाचगाव पोलीसांनी तात्काळ कारवाई करत घटनास्थळी धाड टाकली असता **आरोपी नामे १) शाहरूख वहीद पठाण वय २४ वर्ष रा. डोडमा ता. कुही जि. नागपूर २) शिवकुमार साधुराम लोधा, वय २८ वर्ष रा. उदंरी,ता. उमरेड जि. नागपूर, ३) विजय नारायण कुहीटे वय ३५ वर्ष रा. डोडमा, ता.कुही जि. नागपूर हे जागीच ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना**

मिळुन आले. तसेच आरोपी नामे ४) अलंकार मेश्राम, वय ३२ वर्ष, रा. उदंरी, ता. उमरेड, जि. नागपूर व ५) गणेश इंगळे ,४० वर्ष, रा. कुही फाटा, हे पोलीसांना पाहुन पळुन गेले.

पोलीसांनी पंचाासमक्ष आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ ताशपत्ते, एकुण रोख रक्कम ४,८००/—रुपये, तीन मोबाईल किंमती ३०,५००/— रूपये असा एकुण ३५,३००/— रूपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला. नमुद प्रकरणी  प्रकरणी वरील आरोपी यांच्या विरुद्ध कलम १२ म.जू.का. अन्वये  गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## नरखेड पोलीसांच्या पाठपुराव्यामुळे सावरगाव ते नरखेड मार्गावरील पुलावरील खड्डे बुजविण्यात आले

पोलीस स्टेशन नरखेड हद्दीतील सावरगाव ते नरखेड मार्गावरील पुलावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने वाहनचालकांना वाहतूक करताना अडचणी निर्माण होत होत्या. तसेच अपघात होण्याची शक्यता वाढली होती. याची गंभीर दखल घेऊन नरखेड पोलीसांनी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल यांच्या मार्गदर्शनात संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाशी समन्वय साधून तात्काळ रस्ता दुरुस्तीसाठी पत्रव्यवहार केला.तसेच त्याचा पाठपुरावा केला.

त्याअनुषंगाने संबंधित सार्वजनिक बांधकाम पुलावरील खड्डे बुजविण्याची कार्यवाही तातडीने करून दिनांक ०९/०७/२०२६ रोजी  पुलावरील सर्व खड्डे बुजविण्यात आले आहे. त्यामुळे या मार्गावरील वाहतूक अधिक सुरक्षित व सुरळीत होण्यास मदत झाली आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने